।। श्री ।।

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर ■ बुधवार, दि. ४ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ११६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

मोठेपणा हा वयाने मिळत नाही,
तर तो आपल्या विचारांनी
आणि कर्माने मिळतो.

वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

हित

भावनांच्या खेळात
वरचढ गणित
ओढाओढीच्या खेळात
हरवू नये हित

पत्त्याचा कॅट सारख
असतं आयुष्य
पिसणाऱ्याला माहीत
नसते पुढचं भविष्य

SPOT NEWS

शरद पवारांच्या प्रकृतीत सुधारणा

● **पुणे** – राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले आहे. छातीत सौम्य वेदना जाणवत असल्याने नियमित आरोग्य तपासणी आणि वैद्यकीय देखरेखीसाठी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. याचदरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये डॉक्टरांच्या देखरेखीखाली शरद पवार यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्यांना होत असलेला त्रास आता कमी झाला असून, त्यांची प्रकृती चांगली आहे. त्यामुळे उद्यात्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. शरद पवार महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांच्या तीन दिवसीय दौऱ्यावर होते. दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी धाराशिव येथे असताना दुपारच्या सुमारास त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यामुळे त्यांनी आपला दौरा मध्येच स्थगित केला आणि तातडीने पुण्याकडे रवाना झाले. त्यानंतर त्यांना रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले. रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य हृदयरोगतज्ज्ञ, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. पुरवेझ के. ग्रँट यांनी यासंदर्भात अधिकृत निवेदन जारी केले आहे. या निवेदनात शरद पवार यांच्या प्रकृतीची डॉक्टरांचे पथक नियमित काळजी घेत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या प्रकृतीचा आढावाही घेण्यात आला आहे.

पर्यावरणपूरक फटाक्यांना यंदा मुंबईकरांची पसंती

● **मुंबई** – आनंद आणि मागल्यांचा दिवाळी सण अवघ्या तीन दिवसांवर आला आहे. बाजारपेठेत आकाश दिवे, कपडे आणि सजावट साहित्याबरोबरच विविध प्रकारच्या फटाक्यांनाही ग्राहकांची पसंती मिळत आहे. यामध्ये हवेमध्ये उडणारा मोराच्या पिसारा अर्थात पीकॉक आणि तडतडणारा फवारा (पॉप कॉर्न), लवंगी फटाके, माचिस बंदूक आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहेत. विशेष म्हणजे यंदा पर्यावरणपूरक असलेल्या हिरव्या रंगाच्या (ग्रीन) फटाक्यांची मागणीही सुमारे ५० टक्क्यांनी वाढली आहे.

जिल्हा बँकेत 'सहकार विकास'चे वर्चस्व

विखे-थोरात-गडाख गटाला १७, शिंदे गटाला ३ तर लंके-लोखंडे गटाला एक जागा । आता अध्यक्षपदाच्या निवडीकडे लक्ष



● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष्य लागलेल्या अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेत विखे-थोरात-गडाख यांच्या सहकार विकास आघाडीने १७, सभापती राम शिंदे गटाने ३ तर लंके-लोखंडे यांच्या परिवर्तन आघाडीने एक जागा मिळवत जिल्हा बँकेत शिरकाव केला आहे. सहकार आघाडीने तब्बल १७ जागा जिंकत आपले वर्चस्व अबाधित ठेवले आहे. मात्र राम शिंदे गटाने ३ तर खा. लंके यांनी स्वतः विजय मिळवत सहकार क्षेत्रात शिरकाव केला आहे.

जिल्हा सहकारी बँकेसाठी सोमवारी १० जागेसाठी ८५.४४ टक्के मतदान झाल्यानंतर मंगळवारी मतमोजणी झाली. यामध्ये सोसायटी मतदारसंघात अकोले मधून सिताराम गायकर यांची कन्या संजीवनी शिंदे ४९ मते मिळवून आ. किरण लहमटे (३६ मते) यांचा पराभव केला. राहुरी मतदारसंघात आ. प्राजक्त तनपुरे (८९ मते) मिळवून सत्यजित कदम (१८ मते) यांचा पराभव केला. पारनेर मतदारसंघात खा. निलेश लंके (६३ मते) मिळवून विखे समर्थक राहुल शिंदे (४० मते) यांचा पराभव केला. खा. लंके यांचा विजय झाल्यानंतर समर्थकांनी एकच जल्लोष केला. कर्जत मतदारसंघात शिंदे गटाच्या ज्योती शिंदे (५४ मते) मिळवत विरोधी तुषार पिसाळ (२० मते) यांचा पराभव केला.

शेतीपुरक मतदारसंघात आ. आशुतोष काळे यांनी ७५० मते मिळवत विरोधी सुधीर म्हस्के (१२४ मते) यांचा पराभव केला. महिला राखीव मतदारसंघात अनुराधा नागवडे (२६२५ मते) व संगीता वाघ यांना २२८३ मते मिळवून विजयी झाल्या. तर विरोधी हर्षदा काकडे यांना १४६८ मते तर संध्या महाडुंळे यांना ४९७ मते मिळाल्याने पराभवाला सामोरे जावे लागले.

अनुसुचित जाती-जामाती मतदारसंघात माजी आ. वैभवराव पिचड यांनी २६८७ मते मिळवत माजी खा. सदाशिव लोखंडे यांचे चिरंजीव प्रशांत लोखंडे (१०८७ मते) यांचा पराभव केला. तसेच विमुक्त जाती- भटक्या जमाती मतदारसंघात गणपतराव सांगळे यांनी २४६१ मते मिळवत ज्येष्ठ नेते प्रतापराव ढाकणे यांचे चिरंजीव ऋषिकेश ढाकणे (१२९० मते) यांचा पराभव केला. इतर मागास प्रवर्गातून कारभारी जावळे यांनी २७८४ मते मिळवत जालिंदर वाकचौरे (७३२ मते) यांचा पराभव केला.

जिल्हा बँक बिनविरोध करण्याबाबत माजी खा. यशवंतराव गडाख यांनी आवाहन केले होते. या आवाहनाला विखे-थोरात यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. सभापती राम शिंदे यांनीही यात सहभागी होत सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानुसार शासकीय विश्रामगृहावर झालेल्या बैठकीत खा. लंके यांनीही उपस्थित राहुन सहकार्याची भूमिका दर्शवली. मात्र आपल्याबरोबर विश्वासघात केल्याचा आरोप करत राम शिंदे यांनी उमेदवारी अर्ज माघारीच्या दिवशी सकाळीच आपले चार उमेदवार जाहीर करुन टाकले. यामुळे खा. लंके व माजी खा. सदाशिव लोखंडे यांनी सहकार परिवर्तन आघाडी करत विरोधी पॅनल तयार केले. दरम्यान सहकार विकास आघाडीचे १० तर शिंदे गटाचा एक असे ११ उमेदवार बिनविरोध झाले तर १० जागेसाठी निवडणूक झाली.

यापूर्वी जिल्हा बँकेवर सोसायटी मतदारसंघातून आ. मोनिकाताई राजळे, आ. अक्षय कर्डिले, माजी मंत्री शंकरराव गडाख, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, ज्येष्ठ नेते बिपिनदादा कोल्हे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष राजश्री घुले पाटील, माजी संचालक करण ससाने, संगमनेरचे रणजीत देशमुख आणि दत्तात्रय पानसरे यासह जामखेडमधून सचिन घुमरे बिनविरोध निवडून आलेले आहेत. तसेच बिगर शेती मतदारसंघातून सचिन जगताप हे जिल्हा बँकेत बिनविरोध निवडून आलेले आहेत.

यंदा सहा महिला संचालकपदी

■ या पंचवार्षिक निवडणुकीत सोसायटी मतदार संघाच्या शेवगाव मधून माजी अध्यक्ष तथा माजी आ. चंद्रशेखर घुले यांच्या पत्नी राजश्रीताई घुले, पाथर्डीमधून आ. मोनिकाताई राजळे दुसऱ्यांदा संचालक झाल्या आहेत. कर्जत मधून शिंदे गटाच्या ज्योती शिंदे तर अकोले मधून आ. किरण लहामटे यांचा पराभव करुन सिताराम गायकर यांच्या कन्या संजीवनी शिंदे या विजयी झाल्या आहेत. तर राखीव असलेल्या जागेवर अनुराधा नागवडे या दुसऱ्यांदा तर संध्या महाडुंळे अशा एकुण सहा महिला संचालकपदी विराजमान झाल्या आहेत. त्यामुळे अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीत महिलांना संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जिल्हा बँकेच्या ११ जागा बिनविरोध झाल्यानंतर १० जागेसाठी सोमवारी मतदान झाले. मंगळवारी मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर दुपारपर्यंत सर्व जागेचे निकाल जाहीर झाले. या निवडणुकीत सभापती राम शिंदे यांना तीन जागा, लंके-लोखंडे गटाला एक जागा तर विखे-थोरात-गडाख गटाला १७ जागा मिळाल्या आहेत. यामुळे आता जिल्हा बँकेचा अध्यक्ष कोण होणार याकडे सर्वांच्या नजरा लागून आहेत. जिल्हा बँक निवडणुकीत सर्वच्या सर्व २१ संचालकांची घोषणा झाल्यानंतर आता अध्यक्ष व उपाध्यक्ष कोण? याकडे सर्वांच्या नजरा लागून राहिल्या आहेत.

मेट्रोच्या विस्तारामुळे पुण्याच्या विकासाला नवी गती मिळणार : पंतप्रधान नरेंद्र मोदी

● **पुणे । वीरभूमी–**

पुणे शहराच्या विकासाला आणि शहरातील वाहतुकीला पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे नवी गती मिळणार आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर दरम्यान मेट्रो सेवा सुरू झाल्यामुळे मोठ्या आयटी क्षेत्राला अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. तसेच महाराष्ट्रातील प्रतिकूल हवामानामुळे अडचणीत आलेल्या शेतक-यांच्या पाठीशी केंद्र आणि राज्य सरकार संवेदनशीलतेने उभे असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले.

'माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गिका-३'चे उद्घाटन आणि 'पुणे मेट्रो टप्पा-२'च्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. राज्यपाल जिष्णु देव वर्मा, केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होते.

पुणे हे आयटी, ऑटोमोबाईल, फार्मा, स्टार्टअप, नवोपक्रम आणि उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र असून, मेट्रोच्या वाढत्या सुविधांमुळे शहराच्या आर्थिक विकासालाही चालना मिळेल, असे नमूद करून पंतप्रधान मोदी म्हणाले, देशात सन २०१४ मध्ये केवळ २४८ किलोमीटरचे मेट्रो मार्ग कार्यरत होते. आज हे जाळे सुमारे १२०० किलोमीटरपर्यंत विस्तारले असून, २६ शहरांमध्ये मेट्रो सेवा सुरू आहे. दररोज एक कोटीहून अधिक प्रवासी मेट्रोने प्रवास करीत आहेत. भारतीय मेट्रो नेटवर्क जगातील पहिल्या तीन मोठ्या मेट्रो नेटवर्कमध्ये गणले जात आहे. महाराष्ट्रात २०१४ मध्ये केवळ १० ते ११ किलोमीटर मेट्रो मार्ग सुरू होता. आज सुमारे २०० किलोमीटर मेट्रो मार्ग सेवेत असून, ६८० किलोमीटरहून अधिक मार्गांची कामे सुरू आहेत.राज्यात मेट्रो पायाभूत सुविधांवर अडीच लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यात आली असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले.

महाराष्ट्रातील प्रतिकूल हवामानामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र आणि राज्य सरकार संवेदनशीलतेने उभे असल्याची ग्वाही पंतप्रधान मोदी यांनी दिली. ते म्हणाले, शेतकऱ्यांनी काळजी करू नये, संकटाच्या काळात सरकार त्यांना मदत करेल. दिवाळीच्या सणात दुष्काळग्रस्त आणि संकटात असलेल्या शेतकरी कुटुंबांचाही विचार करून त्यांच्या घरातही सणाचा आनंद निर्माण होण्यासाठी सर्वांनी सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले.

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश (पीएमआर) परिसरात मेट्रो, इलेक्ट्रिक बस, इनर रिंगरोड, आउऊटर रिंगरोड, बोगदे आणि नव्या विमानतळासह आधुनिक वाहतूक सुविधांचे जाळे उभारण्यात येत आहे. या पायाभूत सुविधांच्या माध्यमातून २०३० पर्यंत पुणे महानगर प्रदेश देशातील महत्त्वाचे मोबिलिटी केंद्र बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. पुणे शहरात सुमारे १२० किलोमीटरचे मेट्रो मार्ग तयार झाले असून काही मार्गांची कामे सुरू आहेत. देशातील मेट्रो विस्ताराचा सर्वाधिक लाभ महाराष्ट्राला झाला आहे. राज्यातील १२ महापालिका क्षेत्रांत मेट्रो सुरू आहे किंवा तिचे काम सुरू आहे. मेट्रो ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून आर्थिक विकासाला चालना देणारी यंत्रणा आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मेट्रो-३ हा पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला कलाटणी देणारा प्रकल्प असून, पुण्याच्या भविष्याला नवा आकार देणारा आणि नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीच्या समस्या कमी करणारा ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. पुणे मेट्रो मार्गिका-३ ही देशातील सार्वजनिक-खासगी भागीदारीतून (पीपीपी) साकारलेली पहिली मेट्रो मार्गिका असून, सुमारे ८ हजार ३१३ कोटी रुपये खर्चून हा प्रकल्प पूर्ण झाला आहे. ही मार्गिका देशातील पहिली १०० टक्के महिला संचालित मेट्रो ठरणार आहे.

शेवगाव नगर पालिकेत शिवसेनेच्या नव्या गटाला मान्यता

अमर पुरनाळे गटनेते । नगराध्यक्षा माया मुंढे यांच्यासह चार सदस्यांचा गट

● **शेवगाव । वीरभूमी–**

शेवगाव नगरपरिषदेतील शिवसेना गटाच्या रचनेत बदल करून नव्याने स्थापन करण्यात आलेल्या शिवसेना गटाच्या नव्याने नोंदणीला जिल्हाधिकारी कार्यालयाने अधिकृत मान्यता दिली आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी ३१ ऑक्टोबर रोजी यासंदर्भातील आदेश काढला असून, अमर दिलीपराव पुरनाळे यांची गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या गटात आशुतोष दत्तात्रय डहाळे, शिवानी रोहित कथवटे व नगराध्यक्षा माया अरुण मुंढे यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

शेवगाव नगरपरिषदेच्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शिवसेना गटाच्या गटनेतेपदी नगराध्यक्षा माया मुंढे होत्या. मात्र अंतर्गत वादामुळे गट रचनेत झालेला हा बदल महत्त्वपूर्ण मानला जात आहे. गटाच्या नव्या रचनेला जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता मिळाल्याने या गटाच्या अधिकृत नोंदणीचा मार्ग मोकळा झाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त आदेशानुसार, अमर पुरनाळे यांनी २८ सप्टेंबर २०२६ रोजी शिवसेना गटाच्या रचनेत बदल करण्याबाबत अर्ज सादर केला होता. यापूर्वी १२ जानेवारी २०२६ रोजी शेवगाव नगरपरिषद शिवसेना गटाची नोंदणी करण्यात आली होती. त्यानंतर गटाच्या रचनेत बदल करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने नव्या गटाच्या नोंदणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाने ३० ऑक्टोबर रोजी संबंधितांना सुनावणी नोटीस बजावली होती. त्यानुसार सुनावणी घेऊन सादर करण्यात आलेल्या अर्जासह संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. सुनावणीतील नोंदी व उपलब्ध कागदपत्रांचा विचार करून महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता नियम, १९८७ मधील तरतुदींनुसार शेवगाव नगरपरिषद शिवसेना गट या गटाच्या नोंदणीस मान्यता देण्यात आली. या नव्या गटामध्ये अमर दिलीपराव पुरनाळे यांच्याकडे गटनेतेपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. तर आशुतोष दत्तात्रय डहाळे, शिवानी रोहित कथवटे व नगराध्यक्षा माया अरुण मुंढे यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशामुळे या चार सदस्यांच्या गटाला प्रशासकीय पातळीवर अधिकृत मान्यता प्राप्त झाली आहे.

विशेष म्हणजे, गटाच्या रचनेत बदल करण्यासाठी सादर झालेल्या अर्जापासून सुनावणीपर्यंतची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने अवघ्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे ३१ ऑक्टोबर रोजी अंतिम आदेश जारी केला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या डिजिटल स्वाक्षरीने हा आदेश निर्गमित करण्यात आला आहे. आदेशाची प्रत संबंधित गटनेते तसेच शेवगाव नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना माहिती व पुढील योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे.

शिवसेनेच्या नव्या गटाला अधिकृत मान्यता मिळाल्याने शेवगाव नगरपरिषदेतील राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता असून, आगामी घडामोडींकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दुष्काळी परिस्थितीत चारा उत्पादन वाढीसाठी व्यापक नियोजन करा

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे निर्देश । हायड्रोपोनिक्स चारा उत्पादनाचे प्रात्यक्षिक मॉडेल उभारणार

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध होण्यासाठी आतापासूनच नियोजन करावे. चारा उत्पादन वाढविण्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्ती आणि शासकीय योजनांचा प्रभावी वापर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (दि. २) चारा नियोजनाबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी (व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे), निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी चारा उत्पादन वाढविण्यासाठी विविध पर्यायांचा आढावा घेतला. जिल्ह्यातील धरण क्षेत्रात पाणी कमी झाल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या गाळपेर जमिनीचा चारा लागवडीसाठी उपयोग करता येईल का, याचा संबंधित विभागांनी अभ्यास करावा. तसेच कृषी विभागामार्फत वितरित करण्यात येणाऱ्या मिनी किटच्या माध्यमातून



आणि बीजगुण केंद्रांच्या सहाय्याने चारा लागवडीचे नियोजन करता येईल का, याची तपासणी करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

व्ही.बी.जी. रामजी योजनेअंतर्गत सामूहिक तसेच वैयक्तिक स्वरूपात चारा लागवडीचे प्रकल्प राबविता येतील का, याचा विचार करून प्रत्येक तालुक्यात असे प्रकल्प हाती घेण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. यामुळे स्थानिक पातळीवर चारा उत्पादन वाढविण्यास मदत होईल. तसेच चारा उत्पादनासाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांचा समन्वयाने उपयोग करण्याचेही त्यांनी सूचित केले.

कमी जागेत आणि नियंत्रित पद्धतीने चारा उत्पादन घेण्यासाठी हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या जनावरांच्या बाजारात हायड्रोपोनिक्स पद्धतीने चारा उत्पादनाचे प्रात्यक्षिक मॉडेल उभारण्याबाबत नियोजन करावे. या माध्यमातून शेतकरी आणि पशुपालकांना या तंत्रज्ञानाची माहिती व प्रत्यक्ष अनुभव मिळेल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील साखर कारखान्यांमधून उपलब्ध होणाऱ्या बगॅस तसेच मळीचा पुढील वर्षी पशुधनाच्या खाद्यासाठी उपयोग करता येईल का, याबाबतही संबंधित विभागांनी नियोजन करावे. उपलब्ध उपपदार्थांचा योग्य पद्धतीने वापर करून पशुखाद्याची उपलब्धता वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या निकृष्ट तसेच कोरड्या चाऱ्याचे पोषणमूल्य वाढविण्यासाठी त्यावर युरिया ट्रीटमेंट तसेच संप्रेरकांचा वापर यांसारख्या उपाययोजनांबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करावी. यासाठी मोठ्या प्रमाणात प्रात्यक्षिकांचे आयोजन करून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण द्यावे, असेही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सांगितले.

जिल्ह्यातील पशुधनाला भविष्यात चारा टंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी चारा उत्पादन वाढविणे, पर्यायी चारा स्रोतांचा शोध घेणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि उपलब्ध चाऱ्याचे पोषणमूल्य वाढविणे या सर्व बाबींचा समन्वय साधून संबंधित विभागांनी एकत्रितपणे नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

पाथर्डी तालुक्यातील धनगरवाडीत अनोळखी महिलेचा मृतदेह आढळला

तरुणाच्या सतर्कतेने पोलिसांना माहिती । डायल ११२ वर संपर्क साधताच पोलिसांची घटनास्थळी धाव

● **पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी तालुक्यातील धनगरवाडी परिसरात शेताच्या बांधाजवळ व नदीलगत एका अनोळखी महिलेचा अर्धवट कुजलेला मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. तरुणाच्या सतर्कतेमुळे ही घटना उघडकीस आली. पोलिसांनी मृतदेह पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात हलविला असून, महिलेची ओळख पटविण्यासह मृत्यूच्या कारणाचा तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धनगरवाडी येथील राजेंद्र भारत चितळे (वय २६) हे मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास जनावरांसाठी चारा आणण्यासाठी शेतात गेले होते. त्यावेळी शेताच्या बांधाजवळ तसेच गावालगतच्या नदी परिसरात त्यांना एका अनोळखी महिलेचा कुजलेला मृतदेह दिसून आला. चितळे यांनी प्रसंगावधान राखत डायल ११२ वर संपर्क साधून पाथर्डी पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह रुग्णवाहिकेतून पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला.

मृत महिलेचे वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे असून, तिच्या अंगावर केशरी रंगाची साडी आणि निळ्या रंगाचा ब्लाऊज आहे. अद्याप तिची ओळख पटलेली नाही. मृत्यूचे नेमके कारणही स्पष्ट झाले नसून, उत्तरीय तपासणीनंतर त्याबाबत माहिती मिळण्याची शक्यता आहे.

मृतदेहावरून महिलेची ओळख पटविण्याचा प्रयत्न पोलिसांकडून सुरू असून, या प्रकरणी पुढील तपास व कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

SPOT NEWS

डॉ. श्रुती सोनवणे यांना पीएच.डी. पदवी प्रदान



● श्रीगोंदा । वीरभूमी–

काष्टी येथील परिक्रमा फार्मसी महाविद्यालयात सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. श्रुती चंद्रकांत सोनवणे यांनी राजस्थानमधील सनराइज विद्यापीठातून औषधनिर्माणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली. दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. बालाजी वाकुरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी 'स्थानिक औषधी वनस्पतींचा त्वचारोगावरील उपयोग व औषधनिर्मिती' या विषयावर संशोधन पूर्ण केले. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल कुटुंबीय, महाविद्यालयातील सहकारी व शिक्षण क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

वसुबारसेला कोतुळमध्ये सामूहीक सवत्स गोमाता पूजन

● अकोले । वीरभूमी –

अकोले तालुक्यातील जागृत व नवसाला पावणारे प्रसिद्ध देवस्थान असलेल्या कोतुळ येथील श्री वरद विनायक देवस्थान, नेहमीच सामाजिक व धार्मिक उपक्रमात अग्रेसर असते. हिंदू धर्म शास्त्रानुसार अनादी काळापासून पवित्र व पूज्य असलेली कामधेनू गोमाता ही भारताच्या शेतीचा आरोग्याचा आधार आहे.भगवान प्रभुरामचंद्र यांच्या कुळातील राजा दिलीप याच्या पासून भगवान श्रीकृष्ण ते छत्रपती शिवरायांनी गोमातेची सेवा केल्याचे सर्वज्ञात आहे.म्हणूनच गोमातेला आई माता हा बहुमान प्राप्त होतो.अशा या सवत्स (वासरासह) गोमातेचे दीपावली पूर्वी येणाऱ्या द्वादशीला म्हणजेच वसुबारस या तिथीला श्रद्धापूर्वक वर्षानुवर्षे पूजन केले जाते. कोतुळ मधील श्री वरद विनायक देवस्थान ट्रस्ट व जयभवानी संस्कृती संवर्धन मंडळ कोतुळच्या वतीने दिनांक ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.०० वाजता सामूहिक सवत्स धेनु पूजन करण्यात येणार असून गो प्रेमी भाविक बंधू भगिनींनी गोपूजनास उपस्थित रहावे असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष प्रदीप भाटे, विनय समुद्र कुलदीप नेवासकर सचिन पाटील प्रा. संभाजी पोखरकर, अजित आरोटे, सागर सोनुले, संतोष घाटकर, विद्या परशुरामी, वृषाली समुद्र प्रियंका पाटील वर्षा नेवासाकर यांनी केले आहे.

भंडारदरा धरण शताब्दी महोत्सवा निमित्ताने घाटघरला दहावे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन

● अकोले । वीरभूमी –

आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे जलाशय तथा भंडारदरा धरण (विल्समचे डॅम) शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर भंडारदरा धरणाच्या परिसरात घाटघर येथे निसर्ग संवर्धन जैव विविधता आणि शाश्वत पर्यटनावर मंथन करणारे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन आयोजित करण्यात आल्याची माहिती अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे मुंबई विभाग अध्यक्ष रामनाथ भोजने यांनी दिली. निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात येणारे दहावे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन १४ व १५ नोव्हेंबर रोजी घाटघर, इको सिटी-भंडारदरा, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे होणार आहे. शनिवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी दहा वाजता या संमेलनाचे उद्घाटन होणार आहेत संमेलनात तर रविवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी आठ वाजता समारोप कार्यक्रम होणार आहे दोन दिवसाच्या संमेलनात विविध कार्यक्रम पार पडणार आहेत. पर्यावरण संवर्धनासोबतच जैवविविधतेचे संरक्षण आणि शाश्वत पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टीने हे संमेलन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. समाजसेवक पद्मश्री अण्णासाहेब हजारे, बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे, लिज्जत पापडचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेशराव कोते हे या १४ व १५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय पर्यावरण संमेलनाला प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र चे अध्यक्ष प्रमोद मोरे, चंद्रकांत आडे, कृष्णा भवर, नामदेव गंभीरे, चंद्रकांत शिंदे, अनिल पवार, संतोष जगधने, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. घाटघर-भंडारदरा परिसर हा सह्याद्रीच्या निसर्गसंपदेने समृद्ध असून या परिसरातील वनसंपदा, जलस्रोत, जैवविविधता आणि निसर्गसौंदर्याचे संवर्धन करताना पर्यटनाचा शाश्वत विकास कसा साधता येईल, यावर संमेलनात विचारमंथन होणार आहे. या संमेलनास पर्यावरण प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संमेलन समितीने केले आहे. वनविभाग, पर्यटन क्षेत्र, स्थानिक प्रशासन, ग्रामस्थ, पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयातून पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना देणे, प्लास्टिक प्रदूषण रोखणे, जलस्रोतांचे संरक्षण करणे आणि स्थानिक नागरिकांचा पर्यावरण संवर्धनातील सहभाग वाढविणे, या विषयांवर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून चर्चा होणार आहे. १४ व १५ नोव्हेंबर रोजी घाटघर-भंडारदरा येथे होणारे हे संमेलन पर्यावरण संवर्धनासोबतच सह्याद्रीच्या निसर्गसंपदेचे संरक्षण, जबाबदार पर्यटन आणि स्थानिक सहभाग यांना व्यापक दिशा देणारे ठरणार आहे.

दुर्गम चिक्केवाडीत शिवदुर्ग परिवाराची दिवाळीची गोड भेट!

आठ किलोमीटर डोक्यावरून वाहून नेला दिवाळीचा शिधा । पाच कुटुंबांच्या चेहऱ्यावर फुलविले हास्य

● श्रीगोंदा । वीरभूमी –

गडकिल्ल्यांचे संवर्धन, ट्रेकिंग आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी कार्यरत असलेल्या शिवदुर्ग ट्रेकर्स फाउंडेशनच्या सदस्यांनी सामाजिक बांधिलकी जपत कोल्हापूर जिल्ह्यातील रांगणा किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या दुर्गम चिक्केवाडीतील पाच कुटुंबांना दिवाळीनिमित्त आनंदाचा शिधा वाटप केला. विशेष म्हणजे, आठ किलोमीटरचे अंतर डोक्यावरून साहित्य वाहून नेत या शिलेदारांनी दिवाळीचा आनंद दुर्गम भागातील बांधवांपर्यंत पोहोचविला.

शिवदुर्ग ट्रेकर्स फाउंडेशनच्या १०८ व्या सह्याद्री गडकोट ट्रेकिंग मोहिमेदरम्यान हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून वास्तव्यास असलेल्या चिक्केवाडीतील कुटुंबांना मदतीचा हात देण्याची संधी मिळाल्याने सदस्यांनी समाधान व्यक्त केले. शिधा साहित्य संकलन व वाटपाचे नियोजन संस्थेचे अध्यक्ष राजेश इंगळे यांनी केले.

या मोहिमेत रांगणाई देवीची विधिवत पूजा करून दिवाळीचा दीप प्रज्वलित करण्यात आला. तसेच रांगणा किल्ल्यावरील प्लास्टिक कचरा संकलित करून तो आठ किलोमीटर अंतरावरील भटवाडी येथे आणण्यात आला. फाउंडेशनची ही ८५ वी प्लास्टिक स्वच्छता मोहीम ठरली.

ॲड. गोरख कडूस व नितीन शेळके यांच्या नियोजनाखाली पार पडलेल्या या मोहिमेत ४२ जण सहभागी झाले होते. यावेळी रांगणा किल्ल्यासह बाळूमामा मंदिर (आदमापूर), मौनी बाबा समाधी (पाटगाव) आणि मधाचे गाव पाटगाव या ठिकाणांनाही भेट देण्यात आली. हिल रायडर्स फाउंडेशन, कोल्हापूरचे दोन शिलेदारही मोहिमेत सहभागी झाले होते.

या उपक्रमात डॉ. चंद्रशेखर कळमकर, रामभाऊ जगताप, दिगंबर भुजबळ, मारुती वागसकर, संकेत नलगे, आमिर शेख, रमेश चांदगुडे, अमर भोसले, निखिल ढवळे, अक्षय ओहळ, अमोल बडे, मिठू लंके, शिवकुमार गोसावी, जय दळवी, आविष्कार इंगळे, अक्षय इधाते, संगीता इंगळे, विजया लंके, तारा चांदगुडे, रेणुका गवळी, वैशाली गायकवाड, स्वाती मुळे आदींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



■ छाया । विजय उंडे

शोभा मंडलिक यांच्यासह शेवगाव तालुक्यातील १५ शिक्षकांची 'आयडॉल शिक्षक' म्हणून निवड

● शेवगाव । वीरभूमी–

राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या 'आयडॉल शिक्षक' निवड उपक्रमांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील २०६ शिक्षकांची निवड झाली आहे. यामध्ये शेवगाव तालुक्यातील १५ शिक्षकांचा समावेश आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे यांच्या वतीने ही निवड करण्यात आली.

शिक्षकांच्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक संकल्पना, बालस्नेही अध्यापन, विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्ती, शैक्षणिक गुणवत्ता, शाळा विकासातील योगदान, समाजसहभाग आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचा विचार करून निवड प्रक्रिया राबविण्यात आली. निवड झालेल्या शिक्षकांचे ज्ञान, अनुभव आणि प्रयोगशील अध्यापन पद्धती राज्यातील अन्य शिक्षकांना उपयुक्त ठराव्यात, हा उपक्रमाचा उद्देश आहे.

शेवगाव तालुक्यातील आदर्श गाव वाघोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या मुख्याध्यापिका शोभा रामभाऊ मंडलिक (घुगरे) यांचीही 'आयडॉल शिक्षक' म्हणून निवड झाली आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्तावाढ, कृतीकेंद्रित अध्यापन, बालस्नेही वातावरण, शाळेचा विकास आणि पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेण्यात आली.



शोभा मंडलिक, शिक्षिका

तालुक्यातील निवड झालेल्या शिक्षकांचे केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी डॉ. शंकर गाडेकर आणि गटशिक्षणाधिकारी शैलेजा राऊळ यांनी अभिनंदन केले.

शेवगाव तालुक्यातील निवड झालेले शिक्षक- शोभा मंडलिक (वाघोली), मेनका ढाकणे (बालंबिकानगर), किरण बैरागी (बालमटाकळी), रफिक शेख (म्हसोबावस्ती), शिवाजी कोकाटे (शोभानगर), डॉ. संतोषकुमार राठोड (सुळेपिंपळगाव), पूनम राऊत (चापडगाव), मनिषा वडते (भायगाव), राजाभाऊ इंगळे (शहरटाकळी), अल्ताब बागवान (नांदूर विहिरे), ज्ञानेश्वर माळी (दहिगावशे), धनाजी सूर्यवंशी (ढाकणेवस्ती), सविता चौधरी (शास्त्रीनगर), सविता चव्हाण (खंडोबानगर), प्रा. नितीन मालाणी (बाळासाहेब भारदे हायस्कूल), कैलास कचरे (माळीवाडा) अशी आहेत.

> आयडॉल शिक्षकांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा आणि प्रयोगशील अध्यापन पद्धतीचा उपयोग जिल्ह्यातील व राज्यातील शिक्षकांना होणार आहे. या माध्यमातून तालुक्यातील शिक्षकांची आणि शाळांची उपक्रमशीलता राज्यासमोर येऊन शैक्षणिक गुणवत्तेला नवी दिशा मिळेल.
>
> – शैलेजा राऊळ, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती शेवगाव

एकल महिलांनी निर्भयपणे जीवन जगावे

प्रदीप सबनीस । पाथर्डीत एकल महिलांना दिवाळी फराळ व साडी वाटप



■ छाया । अनिल खाटेर

● पाथर्डी । वीरभूमी–

सार्वजनिक जीवनात वावरताना एकल, विधवा व परीतक्ता महिलांनी निर्भयपणे जीवन जगावे येणाऱ्या परिस्थितीचा सामना करून आपल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील करून घ्यावे. आज प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे काळजी करण्याचे कारण नाही, पश्चिम महाराष्ट्र सेवा भारती संस्था आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे असे प्रतिपादन सेवा भारती संस्थेचे प्रांत सचिव प्रदिप सबनीस यांनी केले.

साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी तसेच जिल्हा समन्वयक अशोक कुटे यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे एकल, विधवा व परीतक्ता महिलांना दिपावली निमित्त फराळ व साड्या वाटपाचा कार्यक्रम साऊ एकल महिला समिती व ग्राम विकास प्रतिष्ठाण पाथर्डी यांचे संयूक्त विद्यमाने आयोजित केला होता या प्रसंगी सबनीस बोलत होते.

कार्यक्रमाचे आयोजन एकल महिला समितीचे पाथर्डी तालुका समन्वयक दिगंबर गाडे यांनी केले होते या प्रसंगी पाथर्डी शहरातील तसेच ग्रामीण भागातील सुमारे १०० महिलांना दिपावली निमित्त फराळ व साड्या वाटप करण्यात आल्या

या प्रसंगी सेवाभारती संस्थेचे प्रविण देशपांडे, उदय भनगे, मनोहर देशपांडे, जिल्हा समन्वयक गणेश राऊत तसेच सामाजिक कार्यकर्ते सुरेश तिजोरे मिस्त्री, राजू सोनवणे, प्रशांत नाना मगर, बंडू नाना संबायत आदी प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश राऊत यांनी केले. दिगंबर गाडे यांनी सूत्रसंचलन करून आभार मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विधवा व एकल महिला भगीनी उपस्थित होत्या.

कारने येऊन घरफोडी करणारी जालना जिल्ह्यातील टोळी जेरबंद; १७.४० लाखांचा मुद्देमाल जप्त

● पारनेर । वीरभूमी–

टाकळी ढोकेश्वर येथील खिलारी वस्तीवर घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या जालना जिल्ह्यातील टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले असून, गुन्ह्यात वापरलेली रेनॉल्ट डस्टर कार, पल्सर मोटारसायकल आणि ६० ग्रॅम सोने असा एकूण १७ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे पारनेर तालुक्यातील घरफोडीचा गुन्हा उघडकीस आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी सुमारे १.१० वाजता खिलारी वस्ती, टाकळी ढोकेश्वर येथील मंगल संतोष गोरडे यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात तीन चोरट्यांनी ३ लाख ९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले होते. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८४०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३) व ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी तपासासाठी पथक नियुक्त केले. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करताना हा गुन्हा जालना जिल्ह्यातील घनसांगवी येथील कार्तिक प्रकाश आव्हाड व त्याच्या साथीदारांनी केल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार पोलिसांनी कार्तिक आव्हाड (वय २०), गणेश प्रकाश आव्हाड (वय २०) अभिषेक ऊर्फ अभि प्रकाश लोमटे (वय २१) या तिघांना ताब्यात घेतले. तपासात डस्टर कार आणि पल्सर मोटारसायकलचा वापर करून चोरी केल्याची माहिती समोर आली. या प्रकरणातील अर्जुन गणपत गायकवाड, पूजा प्रकाश आव्हाड आणि सुमित विनायक पांजगे हे अद्याप फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले.



■ छाया । भगवान गायकवाड

जप्त मुद्देमालामध्ये ८ लाखांची डस्टर कार, १ लाखांची पल्सर मोटारसायकल आणि ८ लाख ४० हजार रुपये किमतीचे ६० ग्रॅम सोने यांचा समावेश आहे. ताब्यातील आरोपींना मुद्देमालासह पारनेर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून, पुढील तपास पारनेर पोलीस करीत आहेत.ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी केली.

बी.एससी. नर्सिंगसाठी नोंदणीची मुदत ६ नोव्हेंबरपर्यंत; संधी चुकवू नका

अबेदा पी. इनामदार यांचे आवाहन । नोंदणी, ऑनलाइन शुल्क भरणे आणि कागदपत्रे सादर करणे यासाठी वेगवेगळ्या अंतिम तारखा

● अहिल्यानगर । वीरभूमी–

महाराष्ट्रात बी.एस्सी. नर्सिंग प्रवेशासाठी नव्या निकषांनुसार पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी ६ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन नोंदणी आणि ''सेशन अप्लाय'' ही प्रक्रिया पूर्ण करावी. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या सूचनेनुसार, ही प्रक्रिया २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी आहे.

महाराष्ट्र मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्च सेंटरच्या (एमएमईआरसी) अध्यक्षा श्रीमती अबेदा पी. इनामदार यांनी आझम कॅम्पस, पुणे येथील अबेदा पी. इनामदार नर्सिंग कॉलेजच्या वतीने विद्यार्थी आणि पालकांना हे आवाहन केले आहे.

केवळ अंतिम तारीख चुकली म्हणून कोणत्याही विद्यार्थ्याची संधी हुकू नये. प्रत्येक अर्जामागे एका विद्यार्थ्याचे स्वप्न आणि कुटुंबाची मेहनत असते. १५ नोव्हेंबर ही प्रवेशाची अंतिम तारीख आहे. नोंदणीची मुदत त्याआधीच संपते, हे पालकांनी लक्षात घ्यावे. आपल्या मुलाचा किंवा मुलीचा अर्ज तपासा आणि सर्व आवश्यक टप्पे वेळेत पूर्ण करा, असे श्रीमती अबेदा पी. इनामदार म्हणाल्या.

विद्यार्थ्यांनी पुढील तीन टप्पे पूर्ण करणे आवश्यक आहे:

* ऑनलाइन नोंदणी आणि 'सेशन अप्लाय'': ही प्रक्रिया ६ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत पूर्ण करावी.
* नोंदणीचे शुल्क भरणे: अधिकृत ऑनलाइन पेमेंट सुविधेद्वारे ७ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत शुल्क भरावे. शुल्क यशस्वीपणे भरल्यानंतरच नोंदणी पूर्ण झाल्याचे मानले जाईल.
* कागदपत्रे अपलोड करून अर्ज सादर करणे: आवश्यक मूळ कागदपत्रांच्या रंगीत स्कॅन प्रती अपलोड कराव्यात. त्यानंतर



७ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत 'सबमिट' बटणावर क्लिक करावे. केवळ कागदपत्रे अपलोड करणे पुरेसे नाही. आवश्यक कागदपत्रे सादर केली नाहीत, तर अर्जाचा संबंधित प्रवर्गातून विचार होणार नाही किंवा अर्ज नाकारला जाऊ शकतो.

सूचनेत नमूद केलेल्या प्रवर्गांसाठी सीईटीतील पात्रतेची किमान पर्सेंटाइल मर्यादा शून्य करण्यात आली आहे. तरीही संबंधित नर्सिंग सीईटी परीक्षा दिलेली असणे आणि प्रवेशाच्या इतर अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. आधीच नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा नोंदणी करू नये.

संस्थास्तरावरील दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी ८ ते १० नोव्हेंबरदरम्यान संबंधित महाविद्यालयात ठरलेल्या नमुन्यात अर्ज करावा. याची अंतिम मुदत १० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत आहे. केवळ ऑनलाइन नोंदणी केल्याने प्रवेश निश्चित होत नाही.

२७ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ५.३० वाजता ज्यांच्याकडे प्रवेशासाठी मिळालेली जागा होती, तसेच संस्थास्तरावरील पहिल्या फेरीत प्रवेश घेतलेले विद्यार्थी दुसऱ्या फेरीसाठी पात्र नाहीत.

आर्थिक मदतीची गरज असलेल्या कुटुंबांनी शिष्यवृत्तीच्या पर्यायांची माहिती घ्यावी, असेही श्रीमती इनामदार यांनी सांगितले.

नर्सिंग शिकण्याची इच्छा आणि मेहनत करण्याची तयारी असलेल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध मदतीची माहिती मिळाली पाहिजे. आमचे महाविद्यालय अल्पसंख्याक संस्था आहे. पात्र आणि मेहनती विद्यार्थ्यांनी अर्ज करावा. त्यांच्यासाठी योग्य शिष्यवृत्ती शोधण्यासाठी आणि अर्ज पूर्ण करण्यासाठी आम्ही शक्य ती मदत करू, असे श्रीमती अबेदा पी. इनामदार म्हणाल्या.

अभ्यासक्रम, शिष्यवृत्तीचे मार्गदर्शन आणि प्रवेश प्रक्रियेची माहिती घेण्यासाठी विद्यार्थी व पालक अबेदा पी. इनामदार नर्सिंग कॉलेजशी +९१ ७४४७४ ४२१०३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS


छाया । विजय उंडे

गौरी शुगरकडून ऊस पुरवठ्याच्या टनेजनुसार शेतकऱ्यांना मोफत साखर

श्रीगोंदा । वीरभूमी–

हिरडगाव व ढवळगाव येथील गौरी शुगरच्या वतीने दिवाळीनिमित्त ऊस उत्पादक शेतकरी आणि कामगारांना मोफत साखर वाटपाचा शुभारंभ ओंकार शुगर ग्रुपचे संचालक प्रशांत बोत्रेपाटील यांच्या हस्ते करण्यात आला. ओंकार ग्रुपचे अध्यक्ष बाबुराव बोत्रेपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. गळीत हंगाम २०२५–२६ मध्ये कारखान्याला ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या ऊस पुरवठ्याच्या टनेजनुसार मोफत साखर देण्यात येणार आहे. तसेच कारखान्यातील प्रत्येक कामगाराला १० किलो साखर आणि आकर्षक साखर बॅग भेट म्हणून दिली जाणार आहे. कारखान्याची हंगामपूर्व तांत्रिक कामे पूर्ण झाली असून लवकरच गळीत हंगाम सुरू होणार आहे. शेतकऱ्यांनी गौरी शुगरला ऊस पुरवठा करून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशांत बोत्रेपाटील यांनी केले. यावेळी सचिन चौधरी, आबासाहेब कोल्हटकर, दादा बनकर, वसंत चरमळ, खांडेकर, प्रदीप पवार आदी उपस्थित होते.

पारनेर-सुपा रस्त्यावर दोन किलोमीटरपर्यंत वाहतूक कोंडी

पारनेर । वीरभूमी–

पारनेर–सुपा रस्त्यावर सकाळपासून वाहतूक कोंडी झाल्याने वाहनचालक आणि नागरिकांचे हाल झाले. सुमारे दोन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. रस्त्यावरील खड्डे, चिखल, साचलेले पाणी, सुरू असलेले काम आणि अवजड वाहनांची वर्दळ यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला. पारनेर शहरातील न्यू इंग्लिश स्कूल येथे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदासाठी मतदान सुरू असल्याने सकाळपासून वाहनांची वर्दळ वाढली होती. मतदानासाठी आलेले नागरिक, स्थानिक वाहतूक आणि पारनेर–सुपा मार्गावरील अवजड वाहनांमुळे कोंडीत भर पडली. या मार्गावरून मोठ्या प्रमाणात उसाची वाहतूक होत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाली. सकाळपासून सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्यावर चिखल आणि पाणी साचले होते. त्यातच रस्त्याचे काम सुरू असल्याने वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी झाली. खड्ड्यांतून मार्ग काढताना वाहनचालकांना कसरत करावी लागत होती. अवजड ट्रक आणि मालवाहू वाहने अडकल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. या कोंडीचा फटका शाळा–महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह नोकरदार आणि दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांना बसला. वाहतूक सुरळीत करण्यासाठी पारनेर पोलिसांच्या वाहतूक विभागाचे प्रयत्न सुरू होते. मात्र, रस्त्याची दुरवस्था, पावसामुळे झालेला चिखल आणि अवजड वाहनांची वर्दळ यामुळे वाहतूक सुरळीत करण्यात अडचणी येत होत्या.

पाथर्डी तालुक्यात अल्पवयीन मुलीची छेडछाड; पालकांची तरुणाविरुद्ध पोलिसांत तक्रार

पाथर्डी । वीरभूमी–

पाथर्डी तालुक्यातील मोहरी येथे एका १४ वर्षीय इयत्ता नववीत शिकणाऱ्या अल्पवयीन शालेय विद्यार्थिनीशी गैरवर्तन करून तिचा विनयभंग केल्याची गंभीर घटना घडली असून याप्रकरणी संबंधित मुलीच्या आईने पाथर्डी पोलीस ठाण्यात लेखी फिर्याद दिली असून, मोहरी येथील अक्षय रावसाहेब हाके याच्याविरुद्ध बाललैंगीक अत्याचार विरोधी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार संबंधित अल्पवयीन मुलगी पाथर्डी येथील एका विद्यालयात इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेत आहे. दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ती नेहमीप्रमाणे शाळेत गेली होती. दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास ती घरी परतल्यानंतर शेतातील कामानिमित्त बाहेर गेली होती. त्यानंतर दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास शेताजवळील ओढ्याच्या परिसरात असताना मोहरी येथील अक्षय रावसाहेब हाके याने तिच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. यावेळी मुलीने आरडाओरडा केल्याने तिचा आवाज ऐकून आई घटनास्थळी धावून गेली. आईने संबंधित तरुणाला जाब विचारण्याचा प्रयत्न केला असता त्याने तिलाही धक्काबुक्की करून खाली पाडले व त्यानंतर संबंधित तरुण घटनास्थळावरून पसार झाला. घरी आल्यानंतर मुलीने घडलेला प्रकार आपल्या वडिलांना सांगितला. त्यानंतर आई–वडिलांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात जाऊन संबंधित तरुणाविरुद्ध तक्रार दाखल केली. अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन केल्याप्रकरणी संबंधितावरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी फिर्यादीने केली आहे. दरम्यान, अल्पवयीन मुलीशी संबंधित हा गंभीर प्रकार असल्याने पोलिसांनी तक्रारीची दखल घेऊन गुन्हा दाखल केला आहे व पुढील तपास करत आहेत.

जिल्हा बँकेला मिळाली संजीवनी; सहकार क्षेत्रात वैभवपर्व

सोसायटी मतदारसंघात संजीवनी शिंदे यांचा आमदार लहामटेंना १३ मतांनी धक्का; पिचड- भांगरे यांची शत्रूचा शत्रू आपला मित्र ही खेळी यशस्वी

अकोले । वीरभूमी–

अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत अकोले तालुक्यातील प्रतिष्ठेच्या लढतीत माजी चेअरमन सीताराम पा. गायकर यांच्या कन्या संजीवनी शिंदे यांनी विद्यमान आमदार डॉ. किरण लहामटे यांचा ४९ विरुद्ध ३६, अशा १३ मतांनी पराभव केला. तर अनुसूचित जाती–जमाती मतदारसंघातून माजी आमदार वैभवराव पिचड यांनी प्रशांत लोखंडे यांचा १,६०० मतांनी पराभव केला. या निकालामुळे अकोले तालुक्याच्या सहकार आणि राजकीय क्षेत्रात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे.

सोसायटी मतदारसंघातील लढत बहुजन समाज विरुद्ध आमदार अशी प्रतिष्ठेची झाली होती. सहकार क्षेत्रातील दांडगा अनुभव आणि मतदारांवरील प्रभाव लक्षात घेता सीताराम पा. गायकर यांच्या कन्या संजीवनी शिंदे यांच्या विजयाने जिल्हा सहकारी बँकेत गायकर गटाचे प्रतिनिधित्व कायम राहिले. सहकार क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या आमदार लहामटे यांना या निकालामुळे धक्का बसला.

अनुसूचित जाती–जमाती मतदारसंघात वैभवराव पिचड यांना २,६८७, तर प्रशांत लोखंडे यांना १,०८७ मते मिळाली. विधानसभेतील सलग पराभवानंतरही संयम राखत पिचड यांनी सहकार क्षेत्रात आपले स्थान मजबूत केले आहे. अकोले नगरपंचायत, अमृतसागर दूध संघ आणि महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळातील संचालकपदानंतर जिल्हा बँकेतील विजयामुळे त्यांच्या सहकार क्षेत्रातील प्रभावात वाढ झाली आहे.


छाया । विद्याचंद्र सातपुते

माजी आमदार वैभवराव पिचड आणि अमित भांगरे यांनी सीताराम पा. गायकर यांना दिलेली साथ, तसेच 'शत्रूचा शत्रू तो आपला मित्र' या राजकीय समीकरणामुळे लहामटे यांचा पराभव झाल्याचे चित्र आहे. या निकालामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता असून आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये पिचड–भांगरे गटाला फायदा होऊ शकतो.

अगस्ती सहकारी साखर कारखाना सुरळीत चालविण्यासाठी आणि शेतकरी हिताच्या दृष्टीने जिल्हा सहकारी बँकेत प्रतिनिधित्व आवश्यक असल्याचे ओळखून सीताराम पा. गायकर यांनी विखे–थोरात गटासोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी वैभवराव पिचड यांच्याशी हातमिळवणी केली. या राजकीय समीकरणातून गायकर यांना कारखान्यासाठी मदत मिळण्याची अपेक्षा असून, कन्या संजीवनी शिंदे यांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या राजकारणात वारसदाराला स्थान मिळविण्यातही ते यशस्वी झाले.

विजयाचा निकाल जाहीर होताच समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केली. फटाक्यांच्या आतषबाजीत विजयोत्सव साजरा करण्यात आला.

अकोलेत एकत्र विजयी मिरवणूक

जिल्हा बँकेच्या निवडणूक निकालानंतर अकोले तालुक्यातील विजयी उमेदवार माजी आमदार वैभवराव पिचड व जिल्हा बँकेचे माजी चेअरमन सीताराम पाटील गायकर यांच्या कन्या सौ. संजीवनी शिंदे यांचे अकोले शहरात आगमन होताच कार्यकर्त्यांनी फटाक्यायांची आतिषबाजी करत जंगी स्वागत केले. विजयी मिरवणूक काढत पिचड – गायकर समर्थकांनी एकच जल्लोष केला. सोसायटी मतदारसंघातून संजीवनी शिंदे व अनुसूचित जाती जमाती मतदारसंघातून माजी आ. वैभवराव पिचड हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. अकोलेत सायंकाळी सात वाजता विजयी उमेदवार माजी आ. वैभवराव पिचड, सौ. संजीवनी शिंदे, ज्येष्ठ नेते सीताराम पाटील गायकर, जिल्हा परिषदेचे अर्थ बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे, डॉ. मधुरा पिचड, यश पिचड आदींची विजयी मिरवणुक काढली. ठिकठिकाणी रस्त्यामध्ये विजयी उमेदवारांचे उत्स्फुर्त स्वागत व महिला भगिनींनी औक्षण करत सत्कार केला. बाजारतळ येथे विजयी सभा घेण्यात आली. यावेळी नेते मंडळी व कार्यकर्त्यांची शुभेच्छा पर मनोगते व्यक्त केले.

नागवडे कारखान्याचे ११.३४ कोटी शेतकरी, कामगारांच्या खात्यावर जमा!

शेतकऱ्यांना ८.७२ कोटी; कामगारांना पगार व बोनसचे २.६२ कोटी : नागवडे

श्रीगोंदा । वीरभूमी –

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याने सभासद शेतकऱ्यांना दिलेल्या शब्दाची पूर्तता करत ऊस विकास प्रोत्साहन अनुदानापोटी ८.७२ कोटी रुपये, तर कामगारांचे पगार व बोनसपोटी २.६२ कोटी रुपये असे एकूण ११.३४ कोटी रुपये संबंधितांच्या बँक खात्यांवर वर्ग केले आहेत. कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांनी ही माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

सन २०२५–२६ च्या गळीत हंगामात कारखान्याने ५ लाख ८१ हजार ६० टन उसाचे गाळप केले. ऊस पुरवठादार सभासद व शेतकऱ्यांना प्रतिटन ३ हजार रुपये याप्रमाणे पहिला हप्ता अदा करण्यात आला आहे. त्यानंतर दिलेल्या शब्दानुसार प्रतिटन १५० रुपये याप्रमाणे ऊस विकास प्रोत्साहन अनुदानाची ८.७२ कोटी रुपयांची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. तसेच



कामगारांचे पगार व बोनसची २.६२ कोटी रुपयांची रक्कमही बँक खात्यांवर वर्ग केली आहे.

सभासदांना गटवार सवलतीच्या दरात साखर वाटप सुरू असून, येत्या ७ तारखेपर्यंत हे वाटप सुरू राहणार आहे. सभासदांनी निर्धारित मुदतीत आपली साखर घेऊन जावी, असे आवाहन नागवडे यांनी केले.

स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांच्या विचारांचा वारसा जपत कारखाना नेहमीच सभासद शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत आला आहे. ऊसदर देण्याबाबत नागवडे कारखाना कधीही मागे राहिला नाही आणि यापुढेही राहणार नाही. शेतकऱ्यांचा स्वाभिमान टिकविण्यासाठी आणि त्यांना योग्य न्याय मिळण्यासाठी सहकारी साखर कारखानदारी टिकणे गरजेचे आहे, असे नागवडे यांनी स्पष्ट केले.

चालू गळीत हंगाम जानेवारी २०२७ अखेरपर्यंत सुरू राहण्याची शक्यता असल्याने ऊस उत्पादकांनी घाई न करता आपला ऊस नागवडे कारखान्याला गळितासाठी देऊन सहकार्य करावे, असे आवाहन राजेंद्र नागवडे यांनी केले. नागवडे सहकारी साखर कारखान्यामुळे परिसरातील शेतकरी आणि कामगारांच्या जीवनाला आर्थिक स्थैर्य व उंची मिळाली आहे. मात्र, सध्या खासगीकरणाचा वाढता प्रभाव चिंताजनक आहे. शेतकऱ्यांना भविष्यात योग्य न्याय मिळवून द्यायचा असेल, तर सहकारी साखर कारखानदारी जिवंत ठेवण्यासाठी ऊस उत्पादक सभासदांनी एकजुटीने सहकार्य करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

खेळातूनही विद्यार्थ्यांना करिअरची संधी

अभय आव्हाड । श्री विवेकानंद विद्यामंदिरातील गुणवंत खेळाडूंचा सत्कार

पाथर्डी । वीरभूमी–

शरीर निरोगी व सदृढ ठेवण्यासाठी खेळ महत्त्वाचे असून, खेळाच्या माध्यमातूनही विद्यार्थ्यांना करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर खेळातही सहभाग घेऊन या संधींचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष तथा पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.



छाया । अनिल खाटेर

पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री विवेकानंद विद्यामंदिर येथे राज्य, विभाग, जिल्हा व तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळविणाऱ्या गुणवंत खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभय आव्हाड होते.

आव्हाड म्हणाले, खेळामुळे विद्यार्थ्यांचे शरीर निरोगी राहते आणि त्याचा अभ्यासातही फायदा होतो. आज विविध क्रीडा प्रकारांतून करिअरच्या संधी उपलब्ध झाल्या असून, विद्यार्थ्यांनी त्यांचा लाभ घेत आपले भविष्य घडवावे.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी व्हॉलीबॉल, खो–खो, कबड्डी, धनुर्विद्या, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग, मैदानी स्पर्धा, कुस्ती, बुद्धिबळ, क्रिकेट आणि योगा अशा विविध क्रीडा प्रकारांत सहभाग घेतला. यामध्ये चार विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर, १७ विद्यार्थ्यांनी विभागस्तरावर, तर १६८ विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर उत्कृष्ट कामगिरी केली. या सर्व खेळाडूंचा संस्थेच्या व विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थाध्यक्ष अभय आव्हाड, मुख्याध्यापक शरद मेढे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी, पर्यवेक्षक संपत घारे, तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन शिरसाठ, प्रा. अरुण नेहूल, किरण जाधव, क्रीडाशिक्षक सतीश डोळे, प्रमोद हंडाळ, गौरव दाणे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. खेळाडूंना यावेळी अल्पोपहार देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गायके यांनी केले. प्रास्ताविक शरद मेढे यांनी, तर आभार अनुजा कुलकर्णी यांनी मानले.

मौलाना आझाद चौक येथील जमातखाना इमारतीची दुरवस्था; दुरुस्तीची मागणी

दुरुस्तीसाठी नगरसेविका दिपाली बंग यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

पाथर्डी । वीरभूमी–

पाथर्डी शहरातील प्रभाग क्रमांक ४ मधील मौलाना आझाद चौक येथील मुस्लिम समाज जमातखाना इमारतीची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, या समाजभवनाची तातडीने दुरुस्ती करून आवश्यक सोयी–सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेविका सौ. दिपाली रामनाथ बांग यांनी पाथर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पाथर्डी शहरातील मौलाना आझाद चौक येथे असलेली ही इमारत परिसरातील नागरिकांसाठी सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमांचे महत्त्वाचे ठिकाण आहे. याची निर्मिती दिवंगत आमदार स्वर्गीय राजीव राजळे यांच्या पुढाकारातून करण्यात आली होती. परिसरातील नागरिकांना विविध सामाजिक, सांस्कृतिक तसेच सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी या सभागृहाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. मात्र, सध्या या सभागृहाची देखभाल व दुरुस्तीअभावी अवस्था अत्यंत खराब झाली आहे.

सभागृहातील लाईट फिटिंग पूर्णपणे खराब झाल्याने पुरेशी प्रकाशव्यवस्था उपलब्ध नाही. तसेच सभागृहाच्या संपूर्ण भिंतींचे रंगकाम करणे आवश्यक असून, खराब झालेल्या फरशा व पायऱ्यांचीही दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सभागृहाची सद्यस्थिती पाहता नागरिकांना विविध कार्यक्रम आयोजित करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सार्वजनिक वापराच्या या वास्तूची अशी दुरवस्था होणे ही चिंतेची बाब असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेच्या संबंधित विभागप्रमुखांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक दुरुस्तीच्या कामांचे अंदाजपत्रक तातडीने तयार करावे. सभागृहातील नवीन लाईट फिटिंग बसविणे, संपूर्ण भिंतींचे रंगकाम करणे, खराब झालेल्या फरशा व पायऱ्यांची दुरुस्ती करणे आदी कामे कोणतीही दिरंगाई न करता लवकरात लवकर पूर्ण करावीत, अशी आग्रही मागणी सौ. बंग यांनी केली आहे.

समाजमंदिराची दुरवस्था लक्षात घेता संबंधित विभागप्रमुखांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी. तसेच करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहितीही कळवावी, अशी विनंती


छाया । अनिल खाटेर

त्यांनी निवेदनातून केली आहे.

सार्वजनिक मालमत्तेची योग्य देखभाल व दुरुस्ती करणे ही नगरपरिषदेची जबाबदारी असून, नागरिकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या जमातखाना इमारतीची दुरुस्ती तातडीने व्हावी, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांकडून बंग यांच्या कडे व्यक्त केली होती.

मतिमंद विद्यार्थ्यांच्या कलाकृतींनी दिवाळीत फुलतो आत्मविश्वासाचा प्रकाश

आकाशकंदील, पणत्या आणि लक्ष्मी मूर्तींची निर्मिती । गेल्या १२ वर्षांपासून उपक्रम सुरू

पाथर्डी । वीरभूमी–

स्वतःच्या मर्यादांवर मात करत इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याच्या उद्देशाने पाथर्डी येथील निवासी मतिमंद विद्यालय व मतिमंद मुलांच्या बालगृहातील विद्यार्थी दिवाळीसाठी आकर्षक सजावटीच्या वस्तू तयार करत आहेत. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आकाशकंदील, मेणाच्या पणत्या, लक्ष्मी मूर्ती आणि विविध सजावटीच्या साहित्याची निर्मिती करून विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास आणि स्वावलंबनाचा संदेश दिला आहे.

शहरापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या या विद्यालयात गेल्या १२ वर्षांपासून दिवाळीच्या साहित्यनिर्मितीचा उपक्रम राबविण्यात येतो. दीपोत्सवासाठी सुमारे दोन महिन्यांपासून विद्यार्थी मेहनत घेतात. तयार साहित्याचे आकर्षक पॅकिंग केले जाते. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या आकाशकंदीलांना ग्राहकांकडून चांगली पसंती मिळते. यासाठी लागणारा कच्चा माल पुण्याहून आणला जातो.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ काही पैसे मिळविण्याची संधी नाही, तर स्वतःच्या क्षमतेची जाणीव आणि भविष्यात स्वावलंबी जीवन जगण्याचा आत्मविश्वास मिळतो. शिक्षक व संस्थाचालकांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य, आनंद आणि जगण्याची उमेद निर्माण होत आहे. विद्यालयातील शिक्षक आणि कर्मचारी हेच विद्यार्थ्यांचे आधार बनले आहेत.

दिवाळी हा आनंद, मांगल्य आणि माणुसकीचा सण आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस आत्मकेंद्री होत असताना या विद्यार्थ्यांचा उपक्रम सामाजिक संवेदनशीलता आणि परोपकाराचे महत्त्व अधोरेखित करतो. विद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या कलाकृतींमधून आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या प्रयत्नांतून स्वावलंबनाची प्रेरणा मिळत आहे.

संस्थेच्या अध्यक्ष अनिता निऱ्हाळी, मुख्याध्यापक सचिन तरवडे, व्यवस्थापक प्रताप निऱ्हाळी, अधीक्षक संभाजी झावरे, प्रभारी मुख्याध्यापक नितेश मेघनर आणि सर्व कर्मचारी विद्यार्थ्यांना या कामात मदत करतात. दिवाळीदरम्यान शहरातील मराठी मुलांच्या शाळेसमोर या साहित्याचे विक्री केंद्र उभारले जाते. अहिल्यानगरमधील काही सेवाभावी व सामाजिक संस्था जाणीवपूर्वक या विद्यालयातून दिवाळी साहित्य खरेदी करतात. नागरिकांकडूनही या उपक्रमाला सहकार्य मिळते.


छाया । अनिल खाटेर

विखे-थोरात एकजुटीचा सहकारात ऐतिहासिक विजय!

सहकार विकास आघाडीचे जिल्हा बँकेवर निर्विवाद वर्चस्व । लढविलेल्या १८ पैकी १७ जागांवर दणदणीत विजय

● अहिल्यानगर । वीरभूमी–

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत सहकार विकास आघाडीने अभूतपूर्व यश संपादन करत लढविलेल्या १८ पैकी १७ जागांवर विजय मिळविला आहे. जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील या अत्यंत प्रतिष्ठेच्या निवडणुकीत सहकार विकास आघाडीने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले असून, विखे-थोरात यांच्या राजकीय एकजुटीवर जिल्ह्यातील शेतकरी, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी आणि बँकेच्या सभासदांनी विश्वासाची मोहोर उमटविली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, माजी मंत्री शंकरराव गडाख, चंद्रशेखर घुले यांच्यासह जिल्ह्यातील सर्व प्रमुख नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेला हा विजय जिल्ह्याच्या राजकीय आणि सहकार क्षेत्रातील महत्त्वपूर्ण घडामोड ठरला आहे.



जिल्हा बँकेची निवडणूक ही केवळ प्रतिस्पर्धी उमेदवारांवर मोठ्या मताधिक्याने संचालक मंडळाच्या निवडीपुरती मर्यादित नव्हती, तर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील नेतृत्व, संघटनशक्ती आणि राजकीय समन्वयाची कसोटी मानली जात होती. या पार्श्वभूमीवर सहकार विकास आघाडीने सुरुवातीपासूनच एकजुटीची भूमिका घेत नियोजनबद्ध पद्धतीने निवडणुकीला सामोरे जाण्याची रणनीती आखली. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, शेतकरी आणि सभासद यांच्याशी असलेला संपर्क, स्थानिक नेत्यांमधील समन्वय आणि कार्यकर्त्यांची संघटनात्मक ताकद या सर्व बाबींचा आघाडीला मोठा फायदा झाला.

या निवडणुकीत सहकार विकास आघाडीने केवळ जागांची संख्या मिळविण्यावर समाधान न मानता अनेक मतदारसंघांत तसेच महिला मतदारसंघांमध्ये आघाडीच्या उमेदवारांना मिळालेला भक्कम पाठिंबा हा या विजयाचा महत्त्वाचा पैलू ठरला. विविध मतदारसंघांतील मतमोजणीदरम्यान उमेदवारांनी घेतलेली मोठी आघाडी पाहता मतदारांनी सहकार विकास आघाडीच्या नेतृत्वावर ठाम विश्वास व्यक्त केल्याचे चित्र स्पष्ट झाले.

निवडणूक प्रक्रियेत संगमनेरमधून रणजीतसिंह देशमुख, नेवासा येथून शंकरराव गडाख, राहाता येथून डॉ. सुजय विखे पाटील, श्रीरामपूरमधून करण ससाणे, पाथर्डीतून आमदार मोनिका राजळे, शेवगावमधून राजश्री घुले पाटील, श्रीगोंद्यातून दत्तात्रय पानसरे, कोपरगावमधून बिबिन कोल्हे, नगर तालुक्यातून अक्षय कर्डिले आणि बिगरशेती मतदारसंघातून सचिन जगताप यांची बिनविरोध निवड झाली. विविध तालुक्यांतील नेतृत्वाने सहकार विकास आघाडीला दिलेली साथ आणि निवडणुकीपूर्वीच झालेली ही बिनविरोध निवड आघाडीच्या संघटनात्मक ताकदीचे द्योतक ठरली.

प्रत्यक्ष निवडणुकीतही सहकार विकास आघाडीच्या उमेदवारांनी आपले वर्चस्व कायम राखले. काळे आशुतोष अशोकराव, नागवडे अनुराधाताई राजेंद्र, वाघ संगीता जयंत, पिचड वैभव मधुकर, जवळे करभारी झुंबर, सांगळे गणपतराव पुंजाजी आणि तनपुरे प्राजक्त प्रसाद यांनी विजय संपादन केला. अनेक मतदारसंघांत प्रतिस्पर्धी उमेदवारांना मोठ्या फरकाने मागे टाकत आघाडीच्या उमेदवारांनी विजय मिळविला. त्यामुळे सहकार विकास आघाडीच्या विजयाची व्याप्ती केवळ संख्यात्मक नसून मतदारांचा ठाम आणि निर्णायक कौल असल्याचे या निकालातून अधोरेखित झाले.

या निवडणुकीतील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे विखे-थोरात यांच्या एकजुटीला मिळालेला व्यापक प्रतिसाद. जिल्ह्याच्या राजकारणात वेगवेगळ्या काळात प्रभावी भूमिका बजावणाऱ्या नेतृत्वाने सहकार क्षेत्राच्या हितासाठी एकत्रितपणे काम करण्याची भूमिका घेतली. या एकत्रित प्रयत्नांना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, शंकरराव गडाख, चंद्रशेखर घुले यांच्यासह जिल्ह्यातील सर्व प्रमुख नेत्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

नेत्यांमधील समन्वय, तालुकानिहाय नियोजन, कार्यकर्त्यांची एकजूट आणि सभासदांशी असलेला थेट संपर्क यामुळे आघाडीला निवडणुकीत निर्णायक यश मिळाले. जिल्हा बँकेच्या निवडणुकीतून विखे-थोरात यांच्या एकत्रित नेतृत्वाची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून, या निकालाचे पडसाद आगामी जिल्ह्याच्या राजकीय आणि सहकार क्षेत्रातील समीकरणांवरही उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या ऐतिहासिक विजयाबद्दल सहकार विकास आघाडीतर्फे जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधव, बँकेचे सभासद, मतदार, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत. मतदारांनी दाखविलेला विश्वास आणि दिलेली साथ हीच आघाडीची खरी ताकद असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

जिल्हा बँक ही शेतकरी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार चळवळीचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे या विजयातून मिळालेली जबाबदारी अधिक व्यापक असून, जिल्ह्यातील सहकार क्षेत्र अधिक सक्षम करणे, शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या बळकटी देणे, सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करणे आणि बँकेच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला गती देणे यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची भूमिका आघाडीतर्फे व्यक्त करण्यात आली.

सहकार आघाडीने लढविलेल्या १८ पैकी १७ जागांवरील विजय, अनेक मतदारसंघांतील मोठे मताधिक्य आणि बिनविरोध निवडींच्या माध्यमातून सहकार विकास आघाडीने जिल्हा बँकेवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. हा विजय केवळ निवडणुकीचा निकाल नसून जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील एकजूट, नेतृत्वावरील विश्वास आणि सामूहिक प्रयत्नांना मिळालेली मोठी पावती ठरला आहे.

जिल्हा बँकेत शेतकरी-कष्टकऱ्यांना न्याय देणार

खा. नीलेश लंके । दहशत आणि दादागिरीला भीक घालणार नाही

● पारनेर । वीरभूमी –

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत सर्व प्रस्थापित शक्ती एकवटल्या असतानाही सर्वसामान्य मतदारांच्या पाठबळावर विजय मिळविला. शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांना बँकेत न्याय मिळवून देणार असून, दहशत आणि दादागिरीच्या राजकारणाला भीक घालणार नाही, असा निर्धार खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला.

जिल्हा सहकारी बँकेतील विजयानंतर पारनेर येथे आयोजित सभेत ते बोलत होते. निवडणुकीतील संघर्ष, विरोधकांचे प्रयत्न, पोलिस प्रशासनाचा वापर आणि बँकेतील कथित अनियमितता यावर त्यांनी परखड भूमिका मांडली.

लंके म्हणाले, सर्वसामान्यांचा विश्वास आणि कार्यकर्त्यांची निष्ठा हीच विजयाची खरी ताकद आहे. चक्रव्यूह भेदून आपण विजयी झालो असून, पैशांचे आमिष दाखवूनही मतदारांनी स्वाभिमान कायम ठेवला. विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आपल्या पाठीशी उभे राहिले. माझे कोणाशीही वैर नाही; मात्र गद्दारी करणे आपल्या स्वभावात नाही. 'जो टायगर होता है, वो अकेला आता है,' असे म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण केला.

बँकेचे ठराव सुरू झाल्यानंतर कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आणि पोलिस प्रशासनाचा वापर करण्यात आला, असा आरोप त्यांनी केला. अधिकाऱ्यांनी कोणाचीही लाचारी पत्करू नये.


■ छाया । भगवान गायकवाड

नीलेश लंकेही गृहमंत्री होऊ शकतो, हे लक्षात ठेवावे, असा इशारा त्यांनी दिला. प्रकाश गाजरे यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली; तरी त्यांनी मतदारांचे संपर्क क्रमांक पाठवून निष्ठा कायम ठेवली. छुपे डाव खेळण्यापेक्षा समोरून वार करा, असे आव्हान त्यांनी विरोधकांना दिले.

पारनेरच्या स्वाभिमानाचा उल्लेख करताना लंके म्हणाले, हा सेनापती बापटांचा तालुका आहे. झुकणारा किंवा स्वाभिमान विकणारा नाही. रावणाचे राज्य संपून रामराज्य आले, तसे पारनेरमध्येही रामराज्य आले आहे. दादागिरी आणि दहशत मला शिकवू नका. लोकसभेच्या निवडणुकीत तुम्हाला घरी पाठविले असून, आगामी निवडणुकीतही आपणच खासदार होणार आणि सत्ता आल्यानंतर मंत्री होणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सत्तेचा गैरवापर होत असून, समाजमाध्यमांवर स्टेटस ठेवल्याबद्दलही गुन्हे दाखल केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. मतांसाठी एमबीबीएस प्रवेशाचे आमिष दाखविण्यात आले होते. आता त्यांनी प्रवेश देऊन दाखवावेत, असे आव्हानही त्यांनी दिले. निवडणुकीत मदत करणाऱ्या विविध पक्षांतील कार्यकर्त्यांची नावे उघड करणार नसल्याचे सांगत, तालुक्यात परकीय शक्तींना शिरकाव करू देऊ नका, असे आवाहन केले. काचेच्या घरात राहणाऱ्यांनी अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला असून, त्यांचा हिशोब चुकता केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

जिल्हा सहकारी बँक ही शेतकऱ्यांची कामधेनू आहे; मात्र ती ठराविक लोकांचा अड्डा बनल्याचा आरोप लंके यांनी केला. काही कारखानदारांना शेकडो कोटींची कर्जे, अनियमितता, मनमानी आणि हातउसणे पैसे देण्याचे प्रकार सुरू असल्याचे ते म्हणाले. बँकेचा कारभार सर्वसामान्य शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या हिताचा करण्यासाठी प्रयत्न करणार असून, गरीब कुटुंबातील मुलांनी उद्योजक व व्यावसायिक व्हावे, यासाठी कमी दरात कर्ज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

बँकिंगचा अभ्यास करून रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार कर्जवाटप आणि नियमांनुसार वसुली केली पाहिजे. हातउसणे पैसे घेणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत. बँकेतील अनियमितता आणि भ्रष्टाचार बाहेर काढण्यासाठी आपण बँकेत गेलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्येही नियोजनबद्ध पद्धतीने शंभर टक्के विजय मिळविण्याचे लक्ष्य असल्याचे लंके यांनी सांगितले. पारनेरच्या जनतेने दाखविलेला विश्वास कायम राखून जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणार, अशी ग्वाही त्यांनी दिली.

जवानांना दिवाळी शुभेच्छा पत्रे पाठवत पीएमश्री शाळेच्या विद्यार्थ्यांनी जपली देशभक्तीची भावना!

आकाशकंदील, पणत्या बनविण्याची कार्यशाळा । प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचा संकल्प

● पाथर्डी । वीरभूमी–

दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा आणि मांगल्याचा सण. या सणाचे औचित्य साधून पाथर्डी शहरातील पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याबरोबरच देशभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचे संस्कार रुजविणारे विविध उपक्रम उत्साहात राबविण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी आकर्षक आकाशकंदील व पणत्या तयार केल्या, तर सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा पत्रे पाठविली.



■ छाया । अनिल खाटेर

शाळेत आयोजित आकाशकंदील व पणत्या बनविण्याच्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. आपल्या कल्पकतेचा आणि सृजनशीलतेचा वापर करून विद्यार्थ्यांनी विविध रंगांचे सुंदर आकाशकंदील व आकर्षक पणत्या तयार केल्या. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या कलाकृतींनी शाळेचा परिसर सजविण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना हस्तकलेचा आनंद मिळण्याबरोबरच स्वनिर्मितीचा अनुभवही घेता आला.

दिवाळीच्या आनंदात देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या जवानांचे योगदान विसरता कामा नये, हा संदेश विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याच्या उद्देशाने जवानांना शुभेच्छा पत्रे पाठविण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. यासाठी विद्यार्थ्यांनी पोस्टकार्ड आकर्षक पद्धतीने सजवून त्यावर सुंदर अक्षरांत मनापासून शुभेच्छा संदेश लिहिले. भारतीय डाक विभागाच्या सहकार्याने ही शुभेच्छा पत्रे जवानांपर्यंत पाठविण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी देशरक्षणासाठी अहोरात्र तत्पर असलेल्या जवानांप्रती आदर, प्रेम आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.

तसेच पर्यावरणाचे संरक्षण आणि प्रदूषणाचे दुष्परिणाम लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचा संकल्प केला. फटाके न फोडण्याची प्रतिज्ञा घेत विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक दिवाळीचा संदेश दिला. सण साजरा करताना आनंदाबरोबरच सामाजिक जाणीव, पर्यावरण संवर्धन आणि देशभक्तीची भावना जोपासण्याचा आदर्श या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी घालून दिला.

या सर्व उपक्रमांच्या यशस्वितेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका नंदा तुपे, छाया चंदनशिव, सविता बडे, मनीषा फटांगरे, मंदा पालवे, ज्योती जाधव, भावना देवरे, कविता शिरसाट आणि ज्योती भोसले, शशिकांत काळोखे यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड, पाथर्डी डाक विभागाचे ऋत्विक धनगर, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सुशीला खाटेर, जयश्री काळोखे, मुख्याध्यापक राजू गोल्हार तसेच पालक उपस्थित होते.

वसुंधरा अॅकॅडमीत आपत्ती व्यवस्थापन जनजागृती कार्यशाळा संपन्न

इयत्ता सातवी ते नववीच्या २१६ विद्यार्थ्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन । शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी प्रत्यक्ष प्रात्यक्षिके

● अकोले । वीरभूमी–

अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अॅकॅडमी, अकोले येथे विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापन, आपत्कालीन परिस्थितीतील सुरक्षितता आणि संकटसमयी योग्य प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित व्हावी, या उद्देशाने आपत्ती व्यवस्थापन जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना आपत्तीच्या प्रसंगी घाबरून न जाता प्रसंगावधान राखून स्वतःचे व इतरांचे संरक्षण कसे करावे, याविषयी या कार्यशाळेतून महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी अहिल्यानगर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन मास्टर ट्रेनर श्री. प्रशांत पांडे, आपदा मित्र श्री. नवनाथ सिनारे आणि श्री. गोकुळ गर्दे हे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्या डॉ. जयश्री राजीव देशमुख यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत व सन्मान करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शकांनी आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व स्पष्ट करताना आग, भूकंप, पूर, अपघात अशा विविध आपत्कालीन परिस्थितींमध्ये घ्यावयाची खबरदारी, आपत्तीपूर्व तयारी, सुरक्षित स्थळी स्थलांतर, बचावकार्य आणि आपत्कालीन मदत याविषयी सविस्तर माहिती दिली. संकटाच्या वेळी घाबरून न जाता शांतपणे विचार करणे, प्रसंगानुरूप योग्य निर्णय घेणे आणि उपलब्ध मदत यंत्रणेचा योग्य वापर करणे किती आवश्यक आहे, हे विविध उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

या कार्यशाळेत इयत्ता सातवी, आठवी आणि नववीतील एकूण २१६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष कृतीतून आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व समजावे, यासाठी मार्गदर्शकांनी विविध सुरक्षितता उपायांची प्रात्यक्षिके सादर केली. आपत्कालीन परिस्थितीत स्वतःची सुरक्षितता कशी राखावी, इतरांना मदत करताना कोणती काळजी घ्यावी आणि बचावकार्य करणाऱ्या यंत्रणांना सहकार्य कसे करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.विशेष म्हणजे, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठीही आपत्ती व्यवस्थापनाची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. शाळेच्या परिसरात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढणे, सुरक्षित ठिकाणी एकत्रित करणे, संभाव्य धोक्यांची पूर्वकल्पना घेणे आणि तातडीने योग्य उपाययोजना करणे याविषयी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे शाळेतील प्रत्येक घटकाला आपत्तीच्या प्रसंगी आपली जबाबदारी समजून घेण्यास मदत झाली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्राजक्ता नेटके, अण्णासाहेब केदार यांनी केले. त्यांनी आपल्या ओघवत्या निवेदनातून आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित करत कार्यक्रमातील प्रत्येक टप्पा सुंदररीत्या गुंफला. कार्यशाळेचे नियोजनही त्यांनी केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, सुरक्षितता आणि जीवनोपयोगी कौशल्यांची जडणघडण यांना वसुंधरा अॅकॅडमीमध्ये विशेष महत्त्व दिले जाते. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, प्रसंगावधान, सामाजिक जाणीव आणि जबाबदारीची भावना निर्माण व्हावी, यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. या कार्यशाळेच्या आयोजनासाठी प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.


■ छाया । विद्याचंद्र सातपुते

'आपत्ती टाळता येत नसली, तरी योग्य पूर्वतयारी आणि जागरूकतेच्या माध्यमातून होणारे नुकसान निश्चितच कमी करता येते,' हा महत्त्वपूर्ण संदेश या कार्यशाळेतून देण्यात आला. विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा उपयुक्त ठरली.